# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. मालमत्तेवर एकुण ७६
**{आकाशचिन्ह विभाग}** ठिकाणी स्वतंत्र आकाशचिन्ह उभारून प्रदिर्शत करण्यास ई-लिलाव (e-Auction) प्रक्रीयेव्दारे जाहिरातीचे हक्क प्रदान करणेकरीताचा प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिपणी :-

१. नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. मालमत्तेवर आकाशचिन्ह उभारून प्रदिर्शत करण्यास ई-निविदेव्दारे एकुण १५१ ठिकाणी स्वतंत्र पचेविस (२५) गृप निहाय जाहिरातीचे हक्क प्रदान करण्यासंबंधात दोनदा ई-निविदा सुचना वर्तमानपत्रात तथा शासनाचे सांकेकीत स्थळ, www.maharashtratenders.gov.in वर प्रकाशित करण्यात आली असता एकाही निविदाकारानी भाग घेतलेला नाही.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग, दिनांक ९ मे २०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियम, [आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ लागू करण्यात आले आहे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, [आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ मधील नियम ५ मधील-

(घ) "सार्वजनिक खुली जागा म्हणजे मनोरंजनाची मैदाने, क्रीडांगणे, उद्याने, बगिचे यामध्ये कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(ण) "पदपथावर आणि सार्वजनिक रस्त्यावर कोणताही जाहिरात फलक किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यात येणार नाही"

वरील अटीनुसार विभागाव्दारे प्रस्तावित केलेल्या पदपथावरील आणि उद्यानातील आकाशचिन्ह फलकाची निविदा काढता येणे शक्य नही.

४. सबब (घ) आणि (ण) या नियमाचे उल्लंघन होणार नाही अशाच मालमत्तेवर/जागेवर आकाशचिन्हे उभारून जाहिरात करण्याकरीता निविदेव्दारे परवानगी देता येईल. वरील पंचेविस (२५) गृप मधील एकुण १५१ आकाशचिन्हे ही खालील प्रमाणे जागेवर आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचे विवरण | आकाशचिन्हांची संख्या |
|---|---|---|
| १ | ईमारतीवर | १२ |
| २ | पथपदावर | ७५ |
| ३ | नाला | १० |
| ४ | सार्वजनिक खुली जागा | ५४ |
| | एकुण | १५१ |

५. वरील नमुद अनुक्रमांक २, पथपदाच्या कडेवरील ७५ आकाशचिन्हे नियम, २०२२ मधील नियम ५(ण) शि सुसंगत नसल्याने लिलाव प्रकीया मधुन वगळावे लागेल आणि अनुक्रमांक १, ३ आणि ४ मधील एकुण ७६ स्थळांकरीता आकाशचिन्हे उभारणेचे अधिकार इच्छुक अभिकरणास प्रदान करणेस्तव निविदा प्रक्रिया राबवावी लागेल त्याकरीता स्थळनिहाय आधारभुत किंमत प्रस्तुत केलेली आहे व निविदा दस्तऐवज सुध्दा तयार केलेले आहेत. प्रस्तुत स्थळनिहाय आधारभुत किंमत व निविदा दस्तऐवजाला मंजुरी प्रदान करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, [आकाशचिन्हे

(स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ मधील तरतुदि विचारात घेवून निविदा प्रक्रीया राबविणेची अनुमती देणेचा प्रश्न विचारात घेणे.
सविस्तर माहिती नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 836/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 13/03/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), आकाशचिन्ह विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात विविध ठिकाणी म.न.पा. मालमत्तेवर एकुण ७६ ठिकाणी स्वतंत्र आकाशचिन्ह उभारून प्रदिर्शत करण्यास ई-लिलाव (e-Auction) प्रक्रीयेव्दारे जाहिरातीचे हक्क प्रदान करणेकरीताच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.